Impact Factor 3.025

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-IV ISSUE-IV APR. 2017

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# संशोधन अहवाल लेखनातील कौशल्य- एक अभ्यास

**व्ही.व्ही. कासले**
अर्थशास्त्र विभाग
महात्मा फुले नुतन महाविद्यालय
मिरजगाव ता. कर्जत जि. अ.नगर

**प्रस्तावना :**

'ज्ञानासाठी शोध' या अर्थानेच 'संशोधन' हा शब्द सर्व सामान्य व्यवहारात प्रचलित आहे . बौध्दिक आणि व्यवहारिक समस्यांची उत्तरे शोधून काढणे हा संशोधनाचा प्रयत्न असतो. संशोधन हा ज्ञानाचा अविभाज्य घटक आहे. संशोधन प्रक्रियेतील विविध पायऱ्यप्रमाणेच अहवाल लेखन ही देखिल महत्वपुर्ण शेवटची पायरी आहे. संशोधन अहवाल लेखनाच्या कौशल्यामुळे संशोधकाला त्याने ज्या-ज्या कृती केल्या, पध्दती वापरल्या, निष्कर्ष काढले त्याची क्रमाने सुत्रबद्ध व लिखित स्वरूपात ,माहिती मिळते.

प्रत्येक संशोधकाने संशोधन अहवाल लेखनातील कौशल्य आत्मसात करणे हे गरजेचे आहे आणि संशोधन अहवाल लेखन कौशल्य हा संशोधन प्रक्रियेच अतिमहत्वाचा घटक आहे.

**शोध निंबधाची उद्दिष्ट्ये:**

१. संशोधन अहवाल लेखनातील कौशल्य समजावून घेणे.
२. संशोधन अहवाल लेखनात येणाऱ्या समस्या समजावून घेणे.
३. संशोधन लेखनाचा अहवाल तयार करताना येणाऱ्या विविध बाबी जाणून घेणे.
४. संशोधन अहवाल का ? व कसा असावा ? हे समजावून घेणे.

**अभ्यास पध्दती :**

हा शोध निंबध पुर्ण करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. विविध पुस्तके, मासिके, इंटरनेट या साधनांचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**शोध निंबधाचे महत्व :**

संशोधकाने केलेल्या संशोधनाचा अहवाल शास्त्रोक्त पध्दतीने लिहिणे आवश्यक असते. कारण अहवाल लेखन हे संशोधना इतकेच महत्वाचे कार्य आहे. संशोधन अहवाल लेखन हे अन्य लिखानापेक्षा भिन्न स्वरूपाचे असते.

**संशोधनाची गृहितके**:

१. संशोधन अहवाल लेखनाशिवाय संशोधन समाजापुढे येत नाही.
२. संशोधन अहवालाचे लेखन करताना समस्या येतात.
३. संशोधन अहवाल भावी संशोधकाना मार्गदर्शक ठरतो.

**संशोधन अहवाल म्हणजे काय?** :

"आशय विश्लेषण व अर्थशोधन झाल्यानंतर अभ्यास विषयाच्या स्वरूपावरून व ते त्या सबंधीच्या निष्कर्षापर्यंतची माहिती सुसुत्रपध्दतीने शब्दांकित करण्याऱ्या क्रियेला संशोधन अहवाल म्हणतात. ".

ISSN 2349-638X
www aiirjournal.com

प्रा. हंसराज यांच्या मते : “समाजाला केलेले परिणामकारक व हेतुपुर्वक निवेदन म्हणजेच खरेखुरे संशोधन अहवाल लेखन होय”.

**अहवाल लेखनाची भाषा :**

अहवालाची भाषा साधी व सोपी हवी. ती अर्थपुर्ण असावी. विचार सहजपणे स्पष्ट करणारी असावी. त्यामध्ये अचूकपणा हवा. अलंकारिक भाषेचा वापर करू नये. संभाषण वजा लेखनाची पध्दत टाळावी.

**उत्कृष्ठ अहवाल लेखनातील घटक :**

**अ. आरंभिक पृष्ठे किंवा प्राथमिक विभाग :**

१. **मुखपृष्ठ** :

अहवालाचे शिर्षक, शोधकर्त्याचे नाव, अहवाल ज्या पदवी-पूर्तीचा भाग म्हणून सादर केला असेल त्या पदवीचे नाव, पदवी प्रदान करणाऱ्या विद्यापीठाचे / महाविद्यालयाचे/अनुदान देणाऱ्या संस्थेचे नाव, अहवाल सादर केल्याचा महिना व वर्ष.

२. **प्रतिज्ञापत्र** :

संशोधकाने संशोधनाचे कार्य स्वत: केले आहे. याची लेखी हमी असते. संशोधकाचे स्वाक्षरीचे प्रतिज्ञापत्र असावे.

३. **प्रमाणपत्र :**

संशोधकाने संशोधनाचे कार्य मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनानुसार स्वत: पुर्ण केले आहे. याची हमी मार्गदर्शक देतो. त्यावर त्याची स्वाक्षरी असते.

४. **ऋणनिर्देश** :

संशोधनासाठी ज्या व्यक्तीने प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष मार्गदर्शन केले त्यांचे आभार संशोधकाने मानावेत.

५. **अनुक्रमणिका** :

अनुक्रमणिकेमुळे संशोधन अहवाल वाचकास संशोधन अहवालाविषयी थोडक्यात कल्पना येते. अनुक्रमणिकेत सर्व घटक पान क्रमांकासह असतात.अनुक्रमणिकेचे प्राथमिक विभाग, अहवालाचा मुख्य विभाग व अंतिम विभाग असे तीन भाग पडतात. मुखपृष्ठ, प्रमाणपत्र, प्रतिज्ञापत्र, ऋणनिर्देश, अनुक्रमणिका यांना रोमन क्रंमाक द्यावेत व अहवालाच्या मुख्य विभागापासून अरेबिक क्रंमाक देणे आवश्यक असते. अहवालात कोष्ठक, आकृत्या व आलेख असल्यास अहवाल वाचकास हे पाहणे सोपे जावे म्हणून त्यांची स्वतंत्र अनुक्रमणिका देण्यात यावी.

**ब . अहवालाचा मुख्य विभाग** :

संशोधन अहवालाचा मुख्य विभागात संशोधनात वापरण्यात आलेली प्रकरणे यांचा समावेश असतो.प्रकरणे संशोधन समस्येचे स्वरूप, व्याप्ती यावर अवलंबून असतात. हे संशोधकाने मार्गदर्शकाच्या सल्यानुसार प्रकरणे निश्चित करावीत. सर्वसाधारणपणे संशोधनात पुढील प्रकरणे वापरण्यात येतात.

१.प्रस्तावना/ पार्श्वभुमी.
२. संशोधन समस्येशी संबधीत साहित्याचा आढावा.
३. संशोधनाची कार्यपध्दती.
४. सामग्री विश्लेषण, अन्वयार्थ आणि निष्कर्ष.
५. सारांश निष्कर्ष व शिफारशी.

**क. अंतिम विभाग** :

संशोधनासाठी विविध संदर्भ साहित्याचा वापर करण्यात येतो. या विभागात संदर्भ ग्रंथसूची व परिशिष्ठांचा समावेश होतो.

**१. संदर्भ ग्रंथसूची** :

संशोधनात वापरलेल्या स्त्रोतांच्या माहितीची संदर्भ ग्रंथसूची असते. संदर्भ ग्रंथसूची मोठी असेल तर पहिल्या भागात पुस्तके व दुसऱ्या भागात मासिके, वर्तमान पत्रे, नियतकालिके यांचा समावेश होतो. यासाठी APA पध्दतीचा वापर केला जातो.

**२. परिशिष्ठे** :

जी माहिती संशोधनासाठी महत्वाची असते. परंतु अहवालात देणे योग्य नाही ती सर्व माहिती परिशिष्ठांमध्ये देणे आवश्यक असते. उदा.प्रश्नावली.

**संशोधन अहवाल लेखनातील समस्या :**

१. भाषेची समस्या.
२. पारिभाषिक शब्दांची समस्या.
३. सामान्य लोकांच्या ज्ञानाची समस्या.
४. संकल्पनांची समस्या.
५.वस्तुनिष्ठतेची समस्या.

**अहवाल लेखनातील कौशल्य :**

अहवाल लेखन ही एक कला आहे. आदर्श अहवाल लेखनावरून संशोधनाचा दर्जा ठरत असतो. संशोधकाला अहवाल लिहिताना विविध कौशल्य वापरावी लागतात. त्याची कौशल्य ही अहवालाच्या रुपाने प्रतिबिंबीत होत असतात.

१. अहवालातील भाषा सुस्पष्ट व साधी, सोपी असावी.
२ अहवालातील माहिती अचुक व वस्तुनिष्ठ मांडलेली असावी.
३ अहवालातील प्रत्येक टप्यातील मजकुर हा विषयाशी संबधीत असावा.
४ लेखन हे सामान्य माणसाला समजेल असे असावे. माहिती अचुक व वस्तुनिष्ठ मांडलेली असावी.
५. शिफारशी स्पष्ट व व्यवस्थित मांडल्या जाव्यात .
६. भाषा ही नि:संदिग्ध असावी.
७. निष्कर्षाच्या अनुषंगाने सुचनाची मांडणी असावी.
८ वस्तुनिष्ठता असावी.
९. लेखनात कृत्रिमता नसावी.
१०. महत्वपुर्ण घटकांना अधोरेखित केलेले असावे.
११. शिर्षक, मुखपृष्ठ, रचना, मार्जिन, छपाई ही व्यवस्थित करण्यात यावी.
१२. अहवाल लेखनात परिपुर्णता असावी, संक्षिप्तता नसावी.

**सारांश** : .

संशोधन अहवाल लेखन कौशल्याला संशोधनात अनन्या साधारण महत्व आहे. संशोधन प्रक्रियेतील महत्वपुर्ण टप्पा आहे. संशोधनात सुरुवातीपासून शेवटपर्यंतच्या प्रक्रियेदरम्यान केलेल्या मेहनतीचे, परिश्रमाची उद्दिष्ठपुर्ती अहवाल लेखनाच्या उत्कृष्ठ स्वरुपावरून आपण पाहु शकतो. संशोधनाच्या दर्जा कसा आहे हे आदर्श अहवाल लेखनावरुन स्पष्ठ होते. ते सपुंर्ण संशोधनाचे प्रतिबिंब असते. म्हणुन संशोधकाने अत्यंत कौशल्यपुर्ण पध्दतीने अहवाल लिहणे आवश्यक असते.

## संदर्भ सुची

१. बापट भा.गो.(१९७७), 'शैक्षणिक संशोधन', पुणे, नुतन प्रकाशन,
२. मुळे रा.श.व उमाठे वि. तु. (१९८७), 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे', नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ ,
३. कोठारी. सी.आर.(१९९०), 'रिर्सच मेथडॉलॉजी', न्यू दिल्ली, विले वेर्स्टन
४. भांडारकर पु.ल..(१९८७), 'सामाजिक संशोधन पध्दती', महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ , नागपूर
५. आगलावे प्रदिप(२०१०), 'सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
६. वरखेडे र, ना व वरखेडे मं, र, (२०१३), 'संशोधनाचे पध्दतीशास्त्र',इन्स्टिट्युट ऑफ नॉलेज इंजिनियरिंग, नाशिक

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com